# मुंबई विद्यापीठ

(REG/ICC/2020-21/९)

## परिपत्रक

विषय : राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड–१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय

संदर्भ: १) सार्वजनिक आरोग्य विभाग, पत्र क्र. करोना–२०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य–५, दिनांक १४/०३/२०२०

२) सार्वजनिक आरोग्य विभाग, पत्र क्र. करोना–२०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य–५, दिनांक १५/०३/२०२०

३) शासन पत्र, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकिर्ण–२०२०/प्र.क्र. ६०/२०/ताशि–१ दि. १६/०३/२०२०

४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. समय–२०२०/ प्र.क्र. ३५/१८ (र.व का.) दिनांक १८/०३/२०२०

५) संकिर्ण–२०२०/ प्र.क्र. ६०/२०/ता.शि.–१ उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन दिनांक १९/०३/२०२०

६) D.O. No. Secy (HE)/MHRD/2020 New Delhi dtd. 21 March, 2020

७) DMU/2020/CR.92/DisM-1, dated 25 March, 2020

८) मुंबई विद्यापीठ परिपत्रक क्र. REG/ICC/2019-20/37 दिनांक ३१ मार्च, २०२०

९) DMU/2020/CR.92/DisM-1, dated 15 April, 2020

१०) उशिसं/कोरोना/२०२०/मवि–१/४०९१, दिनांक १५ एप्रिल, २०२०

११) DMU/2020/CR.92/DisM-1, dated 2 May, 2020

१२) उशिसं/२०२० /कोरोना/मवि-१ दिनांक ४ मे, २०२०

१३) DMU/2020/CR.92/DisM-1, dated 17 May, 2020

१४) उशिसं/२०२० /कोरोना/मवि-१/४१४८ दिनांक १८ मे, २०२०

उपरोक्त संदर्भांकिंत पत्रांच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये, विद्यापीठ उपपरिसरे, आदर्श महाविद्यालये, मान्यता प्राप्त संस्था व विद्यापीठ शैक्षणिक विभागाकरिता परिपत्रक क्र. १ ते ७ तसेच ९ व १२ अन्वये विद्यापीठाने कोरोना विषाणूच्या प्रसारावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत वेळोवेळी परिपत्रके निर्गमित केली होती व उपरोक्त परिपत्रकांतील दिशा निर्देशांचे काटेकोरपणे पालन करण्याचे देखिल सुचित केले होते.

मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग मंत्रालय, मुंबई यांचे उपरोक्त संदर्भ क्र. १३ अन्वये प्राप्त अधिसुचनेनुसार कोरोना विषाणूचे देशाभरातील वाढते संक्रमण रोखण्यासाठी तेवढयाच तत्परतेने व तीव्रतेने खबरदारी घेणे व विविध प्रतिबंधात्मक उपायांचे काटेकोरपणे पालन करण्यासंदर्भात निर्देशित केले आहे. त्याचाच एक भाग म्हणून **दिनांक १८ मे, २०२० ते ३१ मे, २०२० पर्यंत कामकाज बंद (Lockdown)** करण्याच्या

सुचना प्राप्त झाल्या आहेत. तसेच संदर्भाकिंत पत्र क्र. १४ च्या अनुषंगाने उपरोक्त अधिसुचनेतील संबंधित दिशा निर्देशांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासंदर्भात विद्यापीठाने आवश्यक कार्यवाही करण्याबाबत सुचित करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाने दिनांक १९ मे, २०२० रोजी कोव्हिड-१९ च्या पार्श्वभूमीवर टाळेबंदीच्या कालावधीमध्ये रेड झोनमध्ये मोडणाऱ्या काही प्रशासकीय कार्यालयातील अत्यावश्यक प्रशासकीय कार्ये पार पाडताना निगर्मित केलेल्या सुधारित मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने, विद्यापीठातील अशैक्षणिक उद्देश्यासाठी, उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन, निकाल जाहीर करण्यासाठी व ई-कंटेटच्या निर्मितीमध्ये सहभागी असलेले सर्व संबंधित कर्मचारी यांची कार्यालयामध्ये ५ टक्के उपस्थिती किंवा किमान १० कर्मचारी यापैकी जे अधिक असेल अशासाठी परवानगी देण्यात आली आहे. या संदर्भात विद्यापीठातील विविध प्रशासकीय प्रमुखांनी आपले स्तरावर संबंधित प्रशासकीय विभागप्रमुखांना आवश्यक ते कार्य नियोजन करण्याबाबत सूचित करावे. परीक्षांच्या नियोजनाबाबत विद्यापीठामार्फत मार्गदर्शक तत्वे, सूचना, अवंलबिण्याची कार्यपद्धती या बाबत वेळोवेळी परिपत्राकाव्दारे कळविण्यात येईल,

उपरोक्त संदर्भ क्र. १३ शासन अधिसुचनेतील दिशा निर्देशाप्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित आहे. शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांचे अनुषंगाने संबंधित सर्व शैक्षणिक विभागप्रमुख, सर्व शिक्षक, संचालक, सर्व शैक्षणिक विभाग, प्र-संचालक (उप-परिसरे) व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी घरी राहून कामकाज (work from home) करावे. तद्वतच कोव्हिड - १९ च्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेले रेड झोन व नॉन रेड झोन मधील सर्व शैक्षणिक विभागप्रमुख, संचालक, सर्व शैक्षणिक विभाग, प्र-संचालक (उप-परिसरे) उपरोक्त संदर्भ क्र. १३ अन्वये निर्गमित झालेल्या अधिसूचनेनुसार योग्य ती कार्यवाही करावी.

अत्यावश्यक सेवा (आरोग्य केंद्र, स्वच्छता विभाग (सामान्य प्रशासन विभाग), सुरक्षा विभाग, अभियांत्रिकी विभाग पाणी पुरवठा, विद्युत पुरवठा व इतर सेवा) पुरविणाऱ्या प्रशासकीय विभाग प्रमुखांनी पावसाळीपूर्व करावयाच्या कार्याचे नियोजन आपल्यास्तरावर विहीत वेळत पूर्ण होण्या संदर्भात खबरदारी घ्यावी. शासन परिपत्रकातील दिशा निर्देशांचे काटेकोरपणे पालन होईल याची खबरदारी घेण्यात यावी.

या संदर्भात शासनाच्या वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या निर्देशांबाबत सर्व संबंधितांना अवगत करण्यात येईल.

(डॉ. अजय देशमुख)
कुलसचिव

मुंबई- ४०० ०३२
दिनांक : २५ मे, २०२०

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी-**

सर्व शैक्षणिक विभागप्रमुख, सर्व शिक्षक, संचालक, सर्व शैक्षणिक विभाग, प्र-संचालक (उप-परिसरे)